## महाजन कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी यवतमाळ च्या विद्यार्थिनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३० डिसेंबर**

येथील महाजन कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी च्या B.Com. अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी कु. नयना मांढरे व कलश अग्रवाल या उन्हाळी 2025 मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत झळकल्या. त्यांना महाविद्यालयातील प्रा. अजिंदर चावला प्रा. अंजली पाटील प्रा. प्रज्वल गोरे प्रा. साक्षी मिर्जापुरे व कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाचे संस्थेचे अध्यक्ष लताताई महाजन सचिव सदाशिवराव महाजन, सुजाता जिदेवार तसेच प्राचार्य आशिष होरे यांनी कौतुक केले आहे.

दैनिक युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### उभ्या ट्रॅक्टरला धडक; एकाचा मृत्यू

**•युवाराष्ट्र दर्शन पांढरकवडा:** रस्त्यावर धोकादायक स्थितीत उभे असलेल्या ट्रॅक्टरला दुचाकीची धडक बसून एका ३६ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. मृतक श्रीकांत नागोराव रामगडे हे आपल्या पत्नीची प्रसूती झाल्याने तिला पाहण्यासाठी लहान मुलासह दुचाकीने जात होते. धुर्वे यांच्या हॉटेलजवळ आरोपीने ट्रॅक्टर इंडिकेटर किंवा रिफ्लेक्टर न लावता उभा केला होता. अंधारात ट्रॅक्टर न दिसल्याने श्रीकांत यांची दुचाकी त्यावर आदळली, ज्यात त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी सखाराम रामगडे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



### कपाटातील दागिने आणि रोकड लंपास

**•युवाराष्ट्र दर्शन पारवा:** शेतात कापूस वेचायला जाणे एका कुटुंबाला महागात पडले असून अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरातून ३८,००० रुपयांचा ऐवज चोरला आहे. घाटंजी तालुक्यातील विठ्ठल (कवठा) येथील रहिवासी अरविंद मधुकर राठोड यांनी घराची चावी लपवून ठेवली होती. २९ डिसेंबर रोजी दुपारी १ ते २:३० च्या दरम्यान अज्ञात चोरट्याने ती चावी शोधून घराचे कुलूप उघडले आणि आत प्रवेश केला. चोरट्याने कपाटातील ३०,००० रुपये किमतीची सोन्याची पोत, चांदीच्या पायपट्या आणि ५,००० रुपयांची रोकड लंपास केली. पोलिसांनी या घरफोडीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला

# मुख्याध्यापक लाच घेताना अटक

## वैद्यकीय प्रतिकृती देयक काढण्यासाठी मागितले १५०० रुपये

**•युवाराष्ट्र दर्शन पुसद तालुका प्रतिनिधी, दि. ३० डिसेंबर**

शासकीय माध्यमिक आश्रम शाळा खैरखेडा तालुका पुसद येथील पदवीधर प्राथमिक शिक्षक यांची वैद्यकीय प्रतिकृती देयक लवकरात लवकर खात्यात जमा करण्यासाठी शासकीय माध्यमिक आश्रम शाळा खेरखेडा तालुका पुसद या शाळेचे मुख्याध्यापक यांनी दीड हजार रुपयाची लाच मागणी केल्याप्रकरणी त्यांना लाच लुचपत प्रतिबंधक यवतमाळ यांच्यावतीने अटक करण्यात आली आहे.

आरोपी लोकसेवक गौरीशंकर प्रभाकर सैदाणे वय ४४ वर्षे व्यवसाय मुख्याध्यापक शासकिय माध्यमिक आश्राम शाळा खैरखेडा ता. पुसद, जि. यवतमाळ यांचेवर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ यांनी तक्रारदार पदविधर प्राथमिक शिक्षक शासकीय माध्यमिक आश्रम शाळा खैरखेडा यांचे वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक अपर आयुक्त आदिवासी विभाग अमरावती यांचेकडुन मंजुर झाल्यानंतर सदर वैद्यकीय देयक लवकरात लवकर खात्यात जमा करण्याकरीता शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, खैरखेडा शाळेचे मुख्याध्यापक गौरिशंकर सैदाणे यांना वारंवार मागणी करूनही त्यांनी संबंधित देयक खात्यात जमा करण्याकरिता टाळाटाळा करीत दीड हजार रुपयाची मागणी केली.

तक्रारदार यांना १,५००/- रुपयांची लाच मागणी केल्याबाबतची तक्रार लाच लुचपत प्रतिबंधक यवतमाळ यांना दिल्याने सदर तक्रारीचे अनुषंगाने दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक गौरिशंकर सैदाणे मुख्याध्यापक यांनी तक्रारदार यांचे वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक मंजुर करून खात्यात जमा करण्याकरीता १,५००/- रू. लाच रक्कम मागीतल्याचे निष्पन्न झाले आहे. यावरून आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेवुन पो.स्टे. खंडाळा तालुका पुसद येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही बापु बांगर पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावती, सचींद्र शिंदे अपर पोलीस अधीक्षक अमरावती, पोलीस उपअधीक्षक जगदिश परदेशी ॲन्टी करप्शन ब्युरो, वाशिम व पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर ॲन्टी करप्शन ब्युरो यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती अल्का गायकवाड ॲन्टी करप्शन ब्युरो, वाशिम, पोलीस निरीक्षक मनोज ओरके ॲन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ आणि पोलीस अमलदार योगेश खोटे, मंगेश देवकते नेमणुक ॲन्टी करप्शन ब्युरो वाशिम, पोलीस अंमलदार अतुल मत्ते, अब्दुल वसीम, सुधीर कांबळे, पोना सचीन भोयर, राकेश सावसाकडे, भागवत पाटील, सुरज मेश्राम, अतुल नागमोते नेमणुक ॲन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ यांनी केली.

# होमगार्ड वर्धापन(दिन) सप्ताह साजरा

**•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी, दारव्हा, दि. ३० डिसेंबर**

दारव्हा होमगार्ड पथका कडुन 79 वा महाराष्ट्र होमगार्ड वर्धापन दिन सप्ताह साजरा अशोक थोरात जिल्हा समादेशक होमगार्ड अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाने तसेच राजेंद्र बनसोड केंद्र नायक यांच्या मार्गदर्शनाखाली दारव्हा पथका कडुन 79 वा महाराष्ट्र होमगार्ड वर्धापन दिन (सप्ताह) आज २८ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमांचे अध्यक्ष दिनेश गावंडे एपिआय तसेच प्रमुख पाहुणे राजेश चव्हाण व ए.आर. खान तालुका समादेशक अधिकारी, अब्दुल नईम पलटण नायक, अनिल आडे पलटण नायक उपस्थीत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आली सकाळी प्रभात फेरी काढण्यात आली. लगेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात परीसरात स्वच्छता केली. तसेच



पोलीस स्टेशनच्या आवारात व उपजिल्हा रुग्णालय दवाखान्याचा परिसरामध्ये स्वच्छता करण्यात आली. व यावेळी उपजिल्हा रुग्णालया मधील रुग्णांना फळे व बिस्किटाचा वाटप करण्यात आला. प्रथमता कार्यक्रम होमगार्ड संघटनेचे जनक तत्कालीन प्रधानमंत्री मोरार भाई देसाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार घालण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष दिनेश गावंडे API यांनी होमगार्ड विषयी माहिती दिली व त्यांच्या अनुभवातून होमगार्ड सैनिक खरोखर देश सेवे सोबतच कोणताही बंदोबस्त असो दुर्गादेवी गणपती बंदोबस्त असतो व कायदा सुव्यवस्थेचा बंदोबस्त असो होमगार्ड सैनिक ईमानीत बारे पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून बंदोबस्त करतो असे गावंडे आपल्या भाषणात बोलत होते. यावेळी तालुका समादेशक अधिकारी ए.आर. खान यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसंता लोंढे पलटण नायक यांनी केले आभार अब्दुल नईम पलटण नायक यांनी मानले. 79 वा महाराष्ट्र होमगार्ड वर्धापन दिनामध्ये पुरुष व महिला होमगार्ड उपस्थित होते.व दारव्हा, दिग्रस, नेर, लाडखेड आर्णी, होमगार्ड यांनी चांगल्या प्रकारे योगदान करून कार्यक्रम यशस्वी पार पाडला. या वेळी नंदु शेंडे, भागवान शेंद्रे, रामनाथ राऊत, आनंद मडावी, अझर शेख, शिला बोदडे, रेखा घोडे, वंदना भालेराव, कांता राऊत, सुलोचना वाकोडे, सुनंदा महानंदा, विजया रोडे, आदी पथकातील पुरुष व महिला होमगार्ड सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साजिद बेग यांची विजयी घोडदौड, बँक प्रतिनिधी म्हणून अविरोध निवड

**•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी आर्णी, दि. ३० डिसेंबर**

यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे वारे वेगात वाहत असून त्यासाठी निवडून द्यावयाच्या संचालक मंडळास मतदान करण्यासासाठी विविध सेवा सहकारी संस्थेच्या माध्यमातून बँक प्रतिनिधी यांची निवड करण्यात येते. पूर्वाश्रमी चे कॉंग्रेस चे नेते साजिद बेग हे किंग मेकर म्हणून आर्णी च्या राजकारणात ओळखल्या जातात. त्यांनी कॉंग्रेस पक्षाला 'हात' दाखवत बाय बाय केला अन् आर्णी नगरपरिषदमध्ये पूर्ण शक्ती पणाला लावत ८ नगरसेवक निवडून आणले. आणि आपल्या नेतृत्व गुणांचे कौशल्य सिद्ध केले. आता आर्णी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मधून बँक प्रतिनिधी ची निवड होती पण या



निवडणुकीत कोणीही साजिद बेग यांच्या विरुद्ध अर्ज दाखल केला नाही.त्यामुळे त्यांची अविरोध निवड घोषित करण्यात आली.या मुळे आज साजिद बेग यांच्या निवासस्थानी जात अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. आज त्यांचे स्वागत करण्यासाठी यवतमाळ जिल्हा बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील, आर्णी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अनिल आडे, जिल्हा पोलीस पाटील संघटनेचे माजी जिल्हा अध्यक्ष विलास पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आर्णी तालुकाध्यक्ष सुनील पोतगंटवार, सुरेश मोरलेवार, रामेश्वर चौधरी, शेखर खंदार, नवनिर्वाचित नगरसेवक अनवर पठाण, फिरोज सोलंकी,सादिक शेख नगरसेवक अशफाक शेख, शेतकरी सेनेचे प्रमोद कुदळे, जावेद सोलंकी, युनूस शेख,राधेश्याम पाटील वानखडे, परवेज बेग,निलेश बुटले, अश्फाक गायकवाड, निखिल मस्के, स्वप्नील राठोड,आलिम देशमुख, यांच्या सह शेकडो राजकीय सामाजिक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. अनेकांनी फोन द्वारे साजिद बेग यांचे अभिनंदन केले.कमी कालावधीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राज्य सरचिटणीस पद मिळवत स्वतःला सिद्ध करणाऱ्या व उपमुख्यमंत्री अजित पवार व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या गुड बुक मध्ये साजिद बेग यांनी स्थान निर्माण केले आहे.

# चिडीमारी करणाऱ्या युवकाला दिला चोप

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. ३० डिसेंबर**



ढाणकी शहरातील कस्तुरभा गांधी कन्या विद्यालय परिसरातील मुलींची सर्वात मोठे शाळा कॉलेज त्यामुळे परिसरातील गाव खेड्याच्या मुली या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी येत असतात. प्रत्येक गावखेड्याच्या मुली सुरक्षित ढाणकी येथे शाळेत जाणे येणे करण्या करिता शासनाच्या वतीने मोफत बस ची व्यवस्था करण्यात आली. गावातील मुली खाजगी क्लासेसला या मार्गाने राहदारी करतात. गांवात राहदारीचा मुख्यमार्ग असल्याने महिला, मुली मोठ्या संख्येने राहदारी असते. कस्तुरबा गांधी कन्या विद्यालय शाळा मेन रोडला लागून असल्याने नेहमी वर्दळीचे ठिकाण असल्याने गर्दी राहते. याच गर्दीचा फायदा घेऊन चिडीमार करणारे मुलींची छेड काढत असल्याचे वर्तवली जात आहे. कस्तुरबा गांधी कन्या विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गावखेड्याच्या मुलींकरीता शाळेजवळील बस गोडावून समोरील मोकळ्या पतंगणात बसेस येत होत्या. परंतु बस चालक यांनी शाळे जवळील मोकळ्या पटागणात बसेस आणण्यासाठी मनाई केल्यामुळे शाळेतील मुलींना पाई चालत बसस्टँडपर्यंत जावे लागत असल्याने. मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टी कोनातून बस पूर्ववत धन्य गोडावून च्या रिकाम्या जागेत यावी य करिता कस्तुरबा गांधी विद्यालया कडून सर्व विभागाला पत्रव्यवहार करण्यात आला. बस शाळेजवळ येत नसल्याने याचा फायदा घेऊन चिडी मारी वाढली होती. चिडीमारी करणाऱ्या रोड रोमियोंना चोप देण्या करीता ठाणेदार पांडुरंग शिंदे, बिट जमादार मोहन चाटे, पोलीस शिपाई शिवाजी शिंदे आज रोडवर उतरून चांगलाच चोप दिला. बस पूर्ववत शाळे जवळ चालू करण्याची मागणी शाळे सह पालक वर्गातून उमटत आहे.

# पुणे येथे राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा

**•युवाराष्ट्र दर्शनतालुका प्रतिनिधी दिग्रस, दि. ३० डिसेंबर**

ग्रामीण पत्रकाराला एखाद्या वृत्तपत्रात काम करताना किती अडीअडचणींचा सामना करावा लागतो तसेच पत्रकारिता करीत असताना समाजातील समाजकंटकांकडून पत्रकार बांधवांवर होणारे भ्याड हल्ले या सर्व बाबींची दखल घेऊन युवा ग्रामीण पत्रकार संघाची मुहूर्तमेढ रोवून तसेच समाजातील प्रत्येक घटकांच्या,न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असलेली,भारतातील एकमेव संघटना म्हणजे युवा ग्रामीण पत्रकार संघ,आज महाराष्ट्र बरोबरच संपूर्ण देशात अग्रेसर असल्याने, महाराष्ट्र राज्यातील राज्यव्यापी अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा २०२६ला विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पुणे येथे आयोजित करण्यात आलेला आहे,तरी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ परिवारातील सर्व पत्रकार तसेच बांधवांनी होणाऱ्या यवतमाळ



जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधवानी या अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे युवा ग्रामीण पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी सांगितले.

अतिशय कमी कालावधीत फक्त महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण भारतभर जिल्हा,तालुका व सर्कलनुसार आज युवा ग्रामीण पत्रकार संघ स्थापन करून जिथे छोट्या मोठ्या,ग्रामीण आणि शहरी भागातील पत्रकारांना वेगवेगळा दर्जा मिळत असल्याने,त्यांनी जि संकल्पना करून पूर्ण महाराष्ट्र तसेच भारतभरात कुठल्याही लहान मोठ्यांचा भेद नं करता सर्व पत्रकारांना सोबत घेऊन चालण्याचा जो विडा उचलेला आहे त्यास आज खरोखरच महाराष्ट्र व देशात यश मिळाले आणि याचे खरे कारण म्हणजे निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या माध्यमातून गोर गरीब जनतेला सर्वतोपारी मदत होत असल्याने या संघटनेमध्ये राष्ट्रभरातून पत्रकार जुळलेले आहेत आणी एवढेच नव्हे तर भविष्यात संपूर्ण जगभरात निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना करू असे राष्ट्रीय अध्यक्ष गणेशभाऊ कचकलवार यांनी यावेळी सांगितले.

# चुलत काकाकडून पुतणीचे शारीरिक शोषण

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पुसद, दि. ३० डिसेंबर**

पो. स्टे.पुसद ग्रामीण अंतर्गत येत असलेल्या तालुक्यातील जांबबाजार येथील एका अल्पवयीन मुलीचे तिच्या चुलत काकाने शारीरिक शोषण केले.

या घटनेत पीडित मुलगी अडीच महिन्याची गर्भवती झाली. चार दिवसांपूर्वी पोटात दुखत असल्याचे पिडीत मुलीने आपल्या आईला सांगितले. पिडीत मुलीचे पोटात दुखत असल्यामुळे तीला पुसद येथील खाजगी रुग्णालयात तपासणी करण्यात आली. त्या तपासणीत ती अडीच महिन्याची गर्भवती असल्याचे पुढे येताच पीडितेने आपबीती आपल्या आईला सांगितली. पिडीत मुलीच्या आईने तथा पिडीत मुलीने तात्काळ पुसद पो. स्टे.ग्रामिन मध्ये पीडितेने तक्रार दिली.

पोटात अडीच महिण्याचा गर्भ असलेल्या पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. त्या तक्रारी नुसार १७ सप्टेंबर २०२५ रोजी पीडित चे दुपारी आई वडील मोठ्या मुलीची प्रसूती झाल्याने तीची तब्येत पाहण्यासाठी पुसद ला आले होते. यावेळी तिच्या चुलत काकाने घरात येऊन तीचे तोंड दाबून कुकर्म केले. व झालेली घटना कोणाला न सांगण्याची धमकी दिली.

वडिलांच्या भीती पोटी सदर घटना पिडीतेने कोणाला सांगितली नव्हती. दरम्यान २६ सप्टेंबर रोजी घटना उघडकीस आल्या नंतर पीडितेच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ६४ व ३३३ तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारा पासुन संरक्षण कायदा २०१२ च्या कलम ४, ८,१२ अन्वये आरोपी चुलत काका याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास ग्रामीण पोस्टेचे पीएसआय राहुल देशमुख करीत आहेत. दरम्यान आरोपी हा गावात वर्ग ८ ते १० पर्यंत खाजगी कोचिंग क्लास घेत असल्याची माहिती मिळाली आहे. तसेच एलोपेथी औषधी ची जुजबी माहिती असल्यामुळे गावातच लोकांचे उपचार करीत होता अशी देखील माहिती मिळाली आहे.

# डॉ.नीरज वाघमारे गटनेतेपदी

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३० डिसेंबर**

नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे, ॲड. आनंद गायकवाड, आणि



सौ.मीरा रामदास वीर हे नगरसेवक म्हणून निवडून आलेत. वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत डॉ. नीरज वाघमारे यांना गटनेतेपदी निवड करावी असा ठराव पक्षाने घेतला असून त्यानुसार जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी नगरपरिषदेतील वंचित बहुजन आघाडीचा गटनेता म्हणून डॉ. नीरज वाघमारे यांची अधिकृतपणे निवड करून नियुक्तीपत्र प्रदान केले आहे. याप्रसंगी डॉ. नीरज वाघमारे जिल्हाध्यक्ष, तथा नगरसेवक, एड.आनंद गायकवाड, नगरसेवक, सौ मीरा रामदास वीर नगरसेविका, शिवदास कांबळे जिल्हा महासचिव, प्रमोद पाटील शहर महासचिव, धनंजय गायकवाड, माजी जिल्हाध्यक्ष, धम्मवती वासनिक-माजी अध्यक्षा, करूणा मून, करुणा चौधरी, अरविंद दिवे, रामदास वीर, सचिन मनवर, गुणा मानकर, सुधाकर वासनिक, उत्तमराव कांबळे,सुधीर खोब्रागडे,दिपक वीर , वासुदेव भारसाकळे , प्रशांत भारसाकळे,अशोक कयापाक, सिद्धार्थ भवरे, शैलेश भानवे, निरंजन खडसे,संगर गायकवाड, महेश वाघमारे, इत्यादी कार्यकर्ते हजर होते.

# जगदंबा अभियांत्रिकीच्या 'विंग्स-२६' मध्ये हेल्मेट मॅन ऑफ इंडिया - राघवेंद्र सिंग

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३० डिसेंबर**

स्थानिक जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. ३० डिसेंबरला वार्षिक स्नेहसंमेलन विंग्स-२६ मध्ये मुख्यअतिथी "हेल्मेट मॅन ऑफ इंडिया" म्हणून प्रख्यात असलेले राघवेंद्र सिंग यांची उपस्थिती लाभली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अजाबराव वातीले, सचिव डॉ. शितल वातिले, संचालक पवन वातिले, प्राचार्य डॉ. प्रविण डाखोळे, उपप्राचार्य डॉ. विजय भांबेरे, प्राचार्य डॉ. राहुल बिजवार, सर्व विभाग प्रमुख, कार्यक्रम समन्वयक प्रा. अमोल दूमणे, प्रा. धनश्री




पोहरे, प्रा. ओम अडपावार, प्रा. दर्शना शंभरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

हेल्मेट मॅन ऑफ इंडिया राघवेंद्र कुमार यांनी विद्यार्थ्यांना हेल्मेटचे महत्व पटवून देताना सांगितले की हेल्मेट हे हॉस्पिटलच्या बिलापेक्षा खूप स्वस्त आहे, गाडीचा वेग आनंद देतो पण सुरक्षितता जीव वाचवते. हेल्मेट पोलिसांसाठी नसून ते तुमच्या कुटुंबासाठी आहे. एक अपघात तुमचे संपूर्ण आयुष्य बदलू शकतो. तुम्ही विद्यार्थी हे भविष्याचे नागरिक आहात त्यामुळे लहानपणापासूनच रस्ते सुरक्षा शिका व हेल्मेट घालण्याची सवय टाका कारण जीवन अमूल्य आहे त्याचे रक्षण करा. त्यांनी पालकांना संदेशात म्हटले की तुम्ही स्वतः आदर्श बना व हेल्मेट घाला म्हणजेच तुमची मुलेही घालतील कारण हेल्मेट हा पर्याय नाही ती गरज आहे.

पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंता यांनी विद्यार्थ्यांना दुचाकी वाहनासाठी हेल्मेट व चारचाकी वाहनाकरिता सिट बेल्ट यासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती दिली. जगदंबा अभियांत्रिकीने हेल्मेट मॅन ऑफ इंडिया यांना बोलावून विद्यार्थ्यांमध्ये हेल्मेट संदर्भात जागरूकता निर्माण करण्यासाठी घेतलेला पुढाकार हा नक्कीच गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन केले.

राघवेंद्र सिंग यांनी भारतातील पूर्ण राज्यामध्ये आतापर्यंत ७५,००० पेक्षा जास्त हेल्मेटचे वाटप केलेले आहे. याप्रसंगी जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालया तर्फे राघवेंद्र सिंग व कुमार चिंता जिल्हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या हस्ते सुमारे २५० हेल्मेटचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आहे.

संस्थेचे सचिव डॉ. शीतल वातिले यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की विद्यार्थ्यांनी शिस्तपणा, वेळेची योग्य नियोजन, चिकित्सावृत्ती, जिज्ञासा असे विविध सुप्त गुण अंगी जोपासावे. जीवनात यशस्वी होण्याकरता सर्वप्रथम ध्येय निश्चित करून ते ध्येय गाठण्यासाठी सतत प्रयत्नशील असावे.

विंग्स-२६ स्नेहसंमेलनाचे आयोजन दिनांक २९ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत करण्यात आले असून या स्नेहसंमेलना दरम्यान फॅशन शो, नाट्य, नृत्य, डिश व फ्लावर डेकोरेशन, प्रश्नमंजुषा, रांगोळी, कवी संमेलन, जेसीईटी झूम, वाद संवाद, मिमिक्री अशा विविध प्रकारच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

# शेतजमीन विक्रीचे आवाहन

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील भूमिहीन व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना शेतजमीन उपलब्ध करून देण्यासाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना कार्यान्वित आहे. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ४ एकर जिरायती (कोरडवाहू) किंवा २ एकर बागायती (ओलिताखालील) जमीन १०० टक्के अनुदानावर दिली जाते.

या योजनेसाठी जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यातील राणी अमरावती तसेच यवतमाळ शहरालगतच्या ग्रामीण भागातील शेतजमीन खरेदी करण्यात येणार आहे.

**CHANGE OF NAME**
**Old Name _Sonal Prakashrao Amru**
**New Name_ in Documents**
**Nandini Harish Deolikar .**
I will hereafter use my New Name as Nandini Harish Deolikar in all my transactions and deeds.
Add. Anushri Park, Pimpalgaon, Yavatmal 445001 M.S.

युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया
जिल्हा
बुधवार, ३१ डिसेंबर २०२५

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदिया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०१६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

## प्राचार्यच्या विरोधात विद्यार्थी व पालकांचा एल्गार, आश्वासनानंतर आंदोलन मागे



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोरेगाव :** प्राच्र्याची वागणूक शालेय साहित्य खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराला घेवून तसेच विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धापासून दूर ठेवल्यामुळे आज ३० डिसेंबर रोजी शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकारी व विद्यार्थ्यांनी आज शहिद-जान्या-तिम्या जिल्हा परिषद माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयचा मुख्य द्वारासमोर ठिय्या आंदोलन करून थेट प्राचार्याची हकालपट्टी करा, अशी मागणी केली. जि.प.च्या अधिकारी, पदाधिकारी, कर्मचाऱ्यांनी आंदोलनस्थळी भेट देवून आंदोलनकर्ते विद्यार्थी व पालकांना आंदोलन मागे घेण्याची विनंती केली.

शहिद जान्या-तिम्या जिल्हा परिषद माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात मागील दिड वर्षापासून डॉ. प्रभाकर लोंढे हे प्राचार्य पदावर कार्यरत आहेत. मात्र प्राचार्य हे सन्मानाने वागणूक देत नाही, शालेय साहित्य खरेदीमध्ये मोठा गैरव्यवहार केला आहे, विद्यार्थ्यांना क्राडी स्पर्धापासून वंचित ठेवले जात आहे, असा आरोपी गेल्या काही दिवसांपासून शालेय व्यवस्थापन समितीकडून केला जात आहे. दरम्यान गैरव्यवहाराला घेवून जिल्हा परिषदेकडे तक्रार देखील करण्यात आली होती. तक्रारीची चौकशी सुद्धा करण्यात आली. अनेक दिवसांपासून पालक व विद्यार्थ्यांमध्ये प्राचार्य लोंढे विरुद्ध चांगलाच संताप निर्माण झाला होता. अखेर या संतापाचा बांध फुटला आज ३० डिसेंबर रोजी दुपार दरम्यान पालक व विद्यार्थ्यांनी आंदोलनाची भूमिका घेतला. शाळेच्या मुख्य द्वाराला कुलूप ठोकले आणि ठिय्या आंदोलन करीत नारेबाजी सुरू केली. शाळेतून प्राचार्य डॉ. लोंढे यांची हकालपट्टी करावी लावून धरण्यात आली होती. जवळपास ३ ते ४ तास विद्यार्थी, पालकांच्या प्राचार्य लोंढे विरुद्ध संतापाचा राडा सुरू राहिला. या आंदोलनामुळे गोरेगावनगरासह शिक्षणक्षेत्रामध्ये एकच खळबळ उडाली. भर रस्त्यावर सुरू असलेल्या आंदोलनामुळे सुरक्षेच्या दृष्टीकोणातून पोलिस देखील शालेय परिसरात तैनात झाली. जि.प. अधिकारी, पदाधिकारी आंदोलनस्थळी पोहचले. आंदोलनक विद्यार्थी व पालकांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. मात्र प्राचार्य लोंढे यांचे स्थानांतरण करा, अशीच भूमिका घेण्यात आली. अखेर दुपारी १२ वाजेच्या सुमारास तहसीलदार, जि.प. मुकाअ, उपशिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी तसेच जि.प. पदाधिकारी शाळेत दाखल झाले. दरम्यान पालक व विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकूण कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले. ऐवढेच नव्हेतर तुर्त प्राचार्य लोंढे यांच्याकडून प्राचार्य पदाचे पदभारही कमी करण्यात आले. तसेच चौकशी नंतर पुढील कारवाई करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले.

## जिल्हास्तरीय अटल क्रीडा महोत्सवात समूह गायनात इंजोरी शाळेची विजयी हॅट्रिक



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**अर्जुनी-मोर :** तालुक्यातील अवघ्या ४६५ लोकसंख्या असलेले आणि जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांचे मूळ गाव असलेले संतनगरी इंजोरी या छोट्याशा गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने जिल्हास्तरीय अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात समूह गायन स्पर्धेत सलग तिसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावून विजयी हॅट्रिक साधली आहे.

पूर्वी केवळ १५ विद्यार्थी असलेल्या या शाळेची पटसंख्या आज ३१ वर पोहोचली असून, आजूबाजूच्या ६ ते ७ गावांतील विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत. हे यश मुख्याध्यापक रोकडे व सहाय्यक शिक्षक लाखेश्वर लंजे यांच्या अथक परिश्रमांचे फलित आहे. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले असून त्याचा थेट लाभ शाळेच्या यशातून दिसून येतो. मागील तीन वर्षांत शाळेने सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. २०२३ मध्ये एकल गायन, समूह गायन व नाटिका – प्रथम क्रमांक, २०२४ मध्ये समूह गायन व नाटिका – प्रथम क्रमांक, तर २०२५ मध्ये समूह गायन व एकल गायन – प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशामागे जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर, रविंद खोटेले (माजी सरपंच), मोरेश्वर मेश्राम (अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती), सर्व पालकवर्ग व गावकरी बंधू-भगिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

> इंजोरी हे माझे छोटेसे गाव आहे. मागील आठ–नऊ वर्षापासून येथील दोन्ही गुरुजी शाळेची पटसंख्या वाढवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते सांस्कृतिक उपक्रमांमध्ये स्वतः पूर्ण झोकून देतात. त्यांच्या कार्यामुळे गावाच्या शाळेचा नावलौकिक वाढला असून, संपूर्ण गावाशी त्यांचे सलोख्याचे संबंध आहेत. हे दोन्ही गुरुजी खऱ्या अर्थाने उत्कृष्ट शिक्षक आहेत.
>
> **– लायकराम भेंडारकर**
> **अध्यक्ष, जिल्हा परिषद गोंदिया**

## किमान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत नि:शुल्क प्रशिक्षणाला सुरुवात

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत 'किमान कौशल्य विकास कार्यक्रम' जिल्ह्यामध्ये विविध सेक्टरमधील विविध कोर्सेसकरीता नि:शुल्क प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे, या प्रशिक्षणाचा लाभ गोंदिया जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारांनी घ्यावा, असे आवाहन रा.ना.माटे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया यांनी केले आहे.

याअंतर्गत अग्रीकल्चर, ऑटोमोटीव्ह, कन्स्ट्रक्शन, आयटी, इलेक्ट्रॉनिक्स अन्ड हार्डवेअर, टेलिकॉम, अपॅरल, ब्युटी अन्ड वेलनेस, ग्रीन जॉब्स, मिडीया अन्ड एन्टरटेनमेंट, मॅनेजमेंट अन्ड एन्टरप्रेनोरशिप अन्ड प्रोफेशनल स्कील, हेल्थकेअर, स्पोर्ट्स अन्ड फिटनेस तसेच वॉटर मॅनेजमेंट अन्ड प्लम्बींग अशा एकूण १४ सेक्टरचा समावेश आहे.

सदर प्रशिक्षण घेण्याकरीता गोंदिया जिल्ह्यातील इच्छुक असलेल्या उमेदवारांनी https://forms.gle/zRZYiG3kfQmXRZtD9 या लिंकवर क्लीक करुन नोंदणी करावी किंवा सदर लिंकवर क्लीक केल्यानंतर संस्थेचे नाव व पत्ता याबाबतची यादी दिसून येईल, यामधील आपल्या सोईनुसार जी प्रशिक्षण संस्था आपल्याला जवळ असेल अशा प्रशिक्षण संस्थेला प्रत्यक्ष भेट देवून प्रवेश घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत, दुसरा माळा, रुम नं.२१०, गोंदिया येथे प्रत्यक्ष अथवा ०७१८२-२९९१५० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया यांनी कळविले आहे.

## अभिनयात मृणमयी बागडे जिल्ह्यात प्रथम

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सालेकसा :** येथील पीएम श्री जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, हिरडामाली येथील इयत्ता तिसरीत शिकणारी कु. मृणमयी रामेश्वर बागडे हिने बोंडगाव देवी येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात एकपात्री अभिनय स्पर्धेत प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे.

मृणमयीने सादर केलेल्या प्रभावी अभिनयाने परीक्षकांसह उपस्थितांची मने जिंकली. अभिनयासोबतच तिला गायन, नृत्य तसेच अभ्यासातही विशेष गती असून ती सर्वांगीण गुणवत्तेची विद्यार्थिनी म्हणून ओळखली जाते.

या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत असून, यावेळी गटशिक्षणाधिकारी एम.डी. पारधी, मुख्याध्यापक राजेंद्र सांगोडे, केंद्रप्रमुख स्मिता पटले, वर्गशिक्षक श्री ठाकरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कुंभलकर, सरपंच महेश चौधरी, तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थांनी तिचे कौतुक केले.

## मंडई निमित्त आयोजित नाटकाचे उद्घाटन उत्साहात

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**देवरी :** तालुक्यातील मौजा. निलज येथे २८ डिसेंबर रोजी मंडई कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान मंडई निमित्त आयोजित नाटकाचे उद्घाटन माजी आमदार तथा महाराष्ट्र प्रदेश आदिवासी शिवसेनेचे अध्यक्ष सहषराम कोरोटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सौ. अनुसयाताई करमकार, जि.प.सदस्य उषा सहारे, पं.स. सदस्य अंबिका बंजार, पं.स.सदस्य भारती सलामे, नितेश वालदे तसेच समितीचे सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धामणेवाडा येथे हर घर जल योजनेला घरघर

### दिड महिन्यापासून पाणी पुरवठा बंद



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** मागच्या दिड महिन्यापासून गावातील पाणीपुरवठा बंद झाल्याने गोंदिया तालुक्यातील धामणेवाडा येथील नागरिकांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. परिणामी येथील हर घर जल योजनेला घर घर लागली की काय असा प्रश्न गावातील महिला विचारीत आहेत.

येथील ग्राम पंचायत प्रशासनाने मागच्या वर्षभरापासून पाणी पुरवठा योजनेचे विद्युत बिल भरले नाही. त्यामुळे महावितरण ने विद्युत पुरवठा बंद केला. गोड पाण्याची गावात कोणतेही सोय उपलब्ध नसल्यामुळे गावातील महिलाना दीड किलोमीटर दूरून पाणी आणावे लागत आहे. सदर प्रकार मागच्या दिड महिन्यापासून सुरू आहे तरीपण येथील ग्रामपंचायत प्रशासनाने विद्युत पुरवठा सुरू करण्यासाठी कोणतीही उपाययोजना केली नाही त्यामुळे गावकऱ्यात रोष दिसून येत आहे. सदर पाणी पुरवठा केव्हा सुरू होणार याची स्वास्वती नसल्याने हर घर नल योजनेला फुसका बार ठरत आहे .

> **मागणी करूनही गावातील नागरिकांनी पाणी पट्टी भरली नाही. त्यामुळे विद्युत पुरवठा बंद करण्यात आला. तरीपण गाववर्गणीतून सदर समस्या लवकरच सोडविण्यात येईल.**
> **– हिरामण मसराम सरपंच धामणेवाडा**

## जबरन कब्जा करणाऱ्या दलालाला शेतकऱ्यांचा दणका



### आंभोरा येथील प्रकार

> **सदर शेती वडिलोपार्जित असून जवळपास शंभर वर्षापूर्वी पासून गावातील शेतकरी राबीत आहेत. सदर प्रकार म्हणजे दलालाला कडून जोर जबराईने अवैध कब्जा करण्याचा आहे.**
> **- श्री अभिमन्यू रहांगडाले पोलिस पाटील आंभोरा**

गोंदिया : वर्षानुवर्षे शेती राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतावर जबरन कब्जा करणाऱ्या एका जमीन दलालाला गावातील शेतकऱ्यांनी चांगलाच दणका दिल्याचा प्रकार सोमवारी (ता.२९) गोंदिया तालुक्यातील आंभोरा येथे उघडकीस आला. शेतकऱ्यांचे रौद्र रूप पाहून सदर जमीन दलालाला पळता भुई थोडी झाली.

मागच्या शंभर वर्षापासून आंभोरा येथील जवळपास सहा ते सात शेतकरी वडिलोपार्जित शेती कशीत आहेत.अशात शहरातील रहांगडाले नामक शेती दलालाने सदर शेती ही आपल्या आजोबा-पंजोबाची असल्याचे सांगून सदर शेतीवर अवैधरित्या कब्जा करण्याचा प्रयत्न केला. येवढेच नव्हे तर त्याने भूमापन अधिकाऱ्यांना तसेच पोलिस प्रशासनाला सुद्धा सोबत आणले होते हे विशेष. परंतु सदर शेत जमिनीचे सर्व सातबारा व नमुना आठ सर्व शेतकऱ्यांकडे उपलब्ध होते. त्यामुळे भूमापन अधिकाऱ्यांनी सदर जमिनीचे मोजमाप करण्यास नकार दिला. यावेळी रावणवाडी पोलिसांनी चोख बंदोबस्त लावला असला तरी सदर दलालाला आंभोरा वाशीयांनी चांगलाच दणका दिला आहे.

## सरस्वती विद्यालयात भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन




**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**अर्जुनी मोरगाव :** स्थानिक अग्याराम मदनगोपाल शिक्षण संस्था द्वारा संचालित सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी उद्घाटकीय कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. बल्लभदास भुतडा, कोषाध्यक्ष श्री. जयप्रकाश भैय्या, सचिव श्री. सर्वेश भुतडा, प्राचार्य श्री. जे. डी. पठाण, उपप्राचार्य ए. ए. गुरनुले मॅडम, पर्यवेक्षक श्री. एस. जी. राघोरते प्रामुख्याने उपस्थित होते. सदर माजी विद्यार्थी मेळाव्याकरिता १९८६ ते २००१ पर्यंत एस एस सी किंवा एच एस सी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आलेहोते. यात एकूण ३५० माजी विद्यार्थ्यांनी आपला सक्रिय सहभाग नोंदविला. माजी विद्यार्थ्यांकरीता विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अतिशय भारावलेल्या या कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगततून शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या जुन्या वर्ग खोलीतील बाकावर बसून आठवणी जागृत केल्या. माजी शिक्षकांविषयी असलेली आपुलकी, आस्था व प्रेम व्यक्त करण्याकरिता माजी विद्यार्थ्यातर्फे शाळेतील सर्व माजी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. शाळेतर्फे माजी विद्यार्थ्यांना मंचावर आमंत्रित करून सर्वांना स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता माजी विद्यार्थी मेळावा संयोजक श्री. ओंकार लांजेवार, मुकेश शेंडे, इतर संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद तसेच सरस्वती माजी विद्यार्थी संघ समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## वार्षिक दिव्यांगजन महोत्सव तथा दिव्यांग युवक-युवती परिचय सम्मेलन




**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सालेकसा :** दिव्यांग कल्याणकारी संघटना तिरोडा तथा दिव्यांग शिक्षण व प्रशिक्षण संस्था गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२/१२/२०२५ ला अटल बिहारी वाजेपेयी सभागृह तिरोडा येथे वार्षिक दिव्यांगजन महोत्सव मोठ्या थाटामाटात संपन्न झाले. महोत्सवाचे उद्घाटन रजनी कुंभरे सभापती समाज कल्याण जि प गोंदिया यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थानी तेजराम चव्हाण सभापती पंचायत समिती तिरोडा हे होते, कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन अशोकजी असाटी नवनिर्वाचित नगराध्यक्ष, मुख्य वक्ते म्हणुन अमोलजी वालके दिव्यांग उद्यमी नागपूर, नारायणजी ठाकरे तहसीलदार तिरोडा, अभिजीत राऊत डीडीआरसी नागपूर, हे प्रामुख्याने उपस्थीत होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रवीण पटले सदस्य जिल्हा परिषद तुमेश्वरी बघेले जि.प.सदस्य, किरण पारधी सदस्य जिप, सुनंदा पटले उपसभापती पं स. तिरोडा, उपराज जमाईवार सदस्य पं. स.दिपाली,टेंभेकर पं.स सदस्य, रमाकांत खोब्रागडे जेष्ट पत्रकार, वाय टी कटरे माजीसभापती कृ.उ. बा. समिती, महेंद्रजी भांडारकर जिल्हाध्यक्ष प्रहार, विजय बनसोड न.प.सदस्य, सुनील पालांदुरकर सदस्य न.प., देवेंद्र तिवारी सदस्य न.प.,नागेश तरारे सामाजिक कार्यकर्ता, संस्थेचे अध्यक्ष दिगंबर बन्शोड, संस्थेचे सचिव दिनेश पटले, संस्थेचे उपाध्यक्ष शोभेलाल भोंगाडे, राजु कोहळे दिव्यांग महामंडळ, उमा रहांगडाले संगायो शाखा, देवेंद्र भगत तलाठी,तिरोडा तालुकाध्यक्ष राजु बरीयेकर, गोंदिया तालुकाध्यक्ष योगेश लिल्हारे, अर्जुनीमोरगाव तालुकाध्यक्ष अशोक रामटेके, सडकअर्जुनी तालुकाध्यक्ष तारकेश्वरी चव्हाण सालेकसा तालुकाध्यक्ष चंद्रकला डहारे, गोंदिया शहराध्यक्ष हरीश गुप्ता, सहरउपाध्यक्ष सहेबाज शेख, इत्यादी मान्यवर व मोठ्या संख्येत दिव्यांग बंधु भगीनी उपस्थीत होते.

दिव्यांग महोत्सवाअंतर्गत तीन सत्रामध्ये कार्यक्रम पार पडले ज्यामध्ये प्रथम सत्र सकाळी ११ वाजता उद्घाटन समारंभ व कार्यशाळा पार पडले या अंतर्गत प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाचे मुख्य वक्ते अमोल डी वालके शासन पुरस्कृत दिव्यांग उद्यमी नागपूर तसेच नारायण ठाकरे तहसीलदार अभिजीत राऊत डीडीआरसी नागपूर या वक्त्यांनी दिव्यांगांचे अधिनियमातील तरतुदी व शासनाच्या योजना याविषयी सखोल मार्गदर्शन केले. सर्व पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, दिव्यांगांचे योजनामध्ये कोणतीही अडचन येउ देनार नाही व संघटनेला सहकार्य करण्याचे आस्वाशित केले. तसेच अमोल वालके दिव्यांग उद्यमी व नवनिर्वाचित नगराध्यक्ष अशोक असाटी यांचे संस्थेच्या वतीने शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आले. तर दुसऱ्या सत्रामध्ये विवाहपूर्व दिव्यांग युवक युवतींचे परिचय संमेलन पार पडले परिचयामध्ये विदर्भातून आलेल्या ७९ दिव्यांग बांधवांनी विवाहाची इच्छा जाहीर करून आपापले परिचय दिले या परिचयामुळे दिव्यांगांमध्ये सामाजिक बांधिलकी म्हणून एकमेकांपासून प्रेरणा घेत संसारिक जीवन जगण्यास जीवनसाथीची गरज असल्याचे व ते दिव्यांगही साकार करू शकतात असे भावना व्यक्त होत असून यासाठी संस्थेच्या वतीने यावर्षीही एप्रिल महिन्यामध्ये सामूहिक दिव्यांग विवाह समारोह आयोजन करण्यात येईल असे आयोजकांनी सांगितले.

तिसऱ्या सत्रामध्ये सायंकाळी सात वाजता १८ वर्षावरील प्रौढ दिव्यांगांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावे म्हणून त्यांचे सांस्कृतिक व रंगारंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये तेरा दिव्यांग बांधवांनी सहभागीता दर्शवत एक वार्षिक कार्यक्रमाचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे प्रस्तावित संस्थेचे सचिव दिनेश पटले यांनी मांडले असता संस्था संघटनेला कोणताही शासकीय अनुदान नसून दिव्यांगांना शासनाचा योजना कसे जास्तीत जास्त पोहोचवता येतील त्यांच्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी संघटित करून शासन प्रशासन आणि अधिकारी वर्ग जनप्रतिनिधी यांचे सांगड घालून समन्वय करून शेवटच्या घटकापर्यंत लाभ मिळवून देण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस एन रामटेके सर तर कार्यक्रमाचे आभार तिरोडा तालुकाध्यक्ष राजू बरीयेकर यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी तालुकाध्यक्ष राजू बरीयेकर, शहराध्यक्ष तोमेश कटरे, सहर उपाध्यक्ष राजू चोपकर, प्रशांत साखरे, तालुका उपाध्यक्ष देवलाल शरणागत, सचिव जितेंद्र कावळे, संघटन मंत्री राज टेंबरे, रामेश्वर चौधरी, किरण पारधी, सविता चौधरी, कीर्तन बिसेन, शंकर कटरे, संदीप जांभुळकर, शांतकला वघारे,राखी जोशी, यशवंत खोब्रागडे, मुरलीधर पालीवाल जगदीश लोगडे, सरिता चिखलुंडे, हिमवती चौधरी, रवी बेस इत्यादी पदाधिकाऱ्यांनी खूप मेहनत केली.

**जाहीर सुचना**

मेरे पक्षकार श्रीमती कुमुद संतोष बिसेन, निवासी लोहारा, पो. बडगांव, तह. जि. बालाघाट (म.प्र.) ने अपने निम्नलिखित प्लाट के दस्तावेज सर्च रिपोर्ट के लिये मुझे दिये है। प्लाट, संपत्ती का विवरण इस प्रकार है मौजा कटंगीकला, त.सा.क्र. ४१, भू.गट नंबर २२३ पैकी ०.०१ हे.आर. याने ८३-५९ चौ.मि., सरहद गोंदिया नगर परिषद सिमांतर्गत विभाग क्र. ६-१७४ इत्तर भूखंड स्थित गुंठेवारी में निवासी उपयोग के लिये अकृषक किया हुआ खाली प्लाट
**जिसकी - चर्तुसिमा**
**पूर्व** – में ६ मिटर का चौडा रोड
**पश्चिम**– में श्रीमती जानकीदेवी ठाकुर की जमीन
**उत्तर**– में श्रीमती जानकीदेवी ठाकुर की जमीन
**दक्षिण**–में त्रंबक ठाकुर का प्लाट जमीन,
इस प्रकार है। उपरोक्त नमुद प्लाट पर किसी भी व्यक्ती, संस्था, बैंक या अन्य किसी का भी किसी भी प्रकार का हक्क, मालकियत, कर्जा, बोझा, लोन, गिरवी, अतिक्रमण या अधिकार होगा तो संबंधित व्यक्ती यह जाहिर सूचना प्रकाशित होने के ७ दिनों के भितर सबूत के साथ अपनी आपत्ती लिखित स्वरूप में निचे दिये गये कार्यालय में दर्ज करवाये, अन्यथा मेरे द्वारा उपरोक्त नमुद प्लाट संपत्ती की सर्च रिपोर्ट जारी कर दी जायेंगी व उपरोक्त नमुद प्लाट जमीन पर किसी भी प्रकार की कोई आपत्ती नही ऐसा माना जायेगा।

**ॲड. सचिन ओ. बन्सोड**
**ॲडव्होकेट/नोटरी**
**भारत सरकार**
**कार्यालय - बाजपाई ड्रायव्हींग स्कूल के बाजू में, सिव्हील लाईन, गोंदिया, मो. ९८२३५८७९६८**

# सेवाज्येठता २८ जानेवारी २०२५ चा शासन निर्णय उच्च न्यायालयाने निष्प्रभ ठरविला

**माजी शिक्षक आमदार गाणार यांची परिषदेकडून स्पष्टिकरणाची मागणी**
**वर्ध्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यातून हायकोर्टमध्ये प्रकरणे दाखल**

### वर्धेच्या सेवा ज्येष्ठतेचा घोळ तपासण्याची जबाबदारी कोणाची

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. ३०**

महाराष्ट्र खासगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठतेबाबत शासनाने २८ जानेवारी २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील उदाहरणात्मक स्पष्टीकरणास मुंबई उच्च न्यायालयाने अर्थहीन व निष्प्रभ ठरविले आहे.

त्यामुळे सेवाज्येष्ठता ठरविताना महाराष्ट्र खासगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ व २०२३ मधील तरतुदींचे, विशेषतः अनुसूची 'फ'चे काटेकोर पालन करणे कायदेशीर व घटनात्मकदृष्ट्या बंधनकारक असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबई उच्च



प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. महेंद्र गजभिये



माजी शिक्षक आमदार नागो गाणार

### शिक्षक संवर्गासाठी एकच सेवाज्येष्ठता यादी आवश्यक

नियमावलीनुसार प्राथमिक/उच्च प्राथमिक शाळांतील शिक्षकांची सेवाज्येष्ठता अनुसूची 'फ' नियम क्र. १ नुसार, तर माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांची सेवाज्येष्ठता अनुसूची 'फ' नियम क्र. २ नुसार ठरविणे बंधनकारक आहे. शिक्षक कोणत्या वर्गाला शिकवतो किंवा कोणती वेतनश्रेणी घेतो, याचा सेवाज्येष्ठतेच्या प्रवर्गाशी कोणताही संबंध नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

न्यायालयाने यापूर्वीही नियमावलीशी विसंगत असलेले शासन निर्णय निष्प्रभ ठरविले असून, दिनांक २५ एप्रिल २०१९ रोजी ६१ रिट पिटीशन्समध्ये दिलेल्या ऐतिहासिक निवाड्यात तसेच २२ एप्रिल २०२५ रोजी रिट पिटीशन क्र. १६२२८/२०२३ मध्ये हे तत्त्व पुनः अधोरेखित केले आहे. नियमावलीतील तरतुदींवर केवळ प्रशासकीय स्वरूपाच्या शासन निर्णयाचा कोणताही प्रभाव पडू शकत नाही, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे.



जयश्री घारफळकर (राऊत)
शिक्षणाधिकारी माध्यमिक, वर्धा

**सेवाज्येष्ठतेबाबत मोठा गोंधळ**

२८ जानेवारी २०२५ च्या शासन परिपत्रकातील स्पष्टीकरणामुळे राज्यभरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये सेवाज्येष्ठता याद्या तयार करताना मोठ्या प्रमाणावर गोंधळ निर्माण झाला आहे. अनेक संस्था चालकांनी अनुसूची 'फ' नियम क्र. २ चे उल्लंघन करून इयत्ता ५ ते ८ व इयत्ता ९ ते १२ मधील शिक्षकांच्या स्वतंत्र सेवाज्येष्ठता याद्या प्रसिद्ध केल्या आहेत. ही कृती नियमबाह्य व बेकायदेशीर असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेकडून करण्यात आला आहे.

### स्पष्टीकरण तात्काळ द्यावे : शिक्षक परिषदेची मागणी

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने याबाबत शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक व सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदने सादर करून नियमावलीशी सुसंगत असे खुलासा वजा स्पष्टीकरण तात्काळ निर्गमित करण्याची मागणी केली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही होऊ शकते, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



# शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांच्या मध्यस्थीने बांधकाम कामगार संघटनेचे उपोषण स्थगित

**उपोषणकर्ते बांधकाम कामगार संघटनेच्या मागण्या कामगार अधिकारी सचिन अरबट व रिना पोराटे यांनी केल्या मान्य ; सचिन अरबट यांनी सोडले सुनील उपासे यांचे उपोषण**

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. ३०**

नोंदणीकृत गवंडी बांधकाम कामगारांच्या परिवारासाठी असलेल्या योजनेचा लाभ कामगार कार्यालयातून मिळत नसल्याने संतापलेल्या जिल्ह्यातील विविध गवंडी बांधकाम कामगार संघटनेच्या नेत्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता. उपोषणावर बसताच कामगार कार्यालयाचे नोंदणी अधिकारी सचिन अरबट यांनी शिवसेनेच्या मध्यस्तीने कामगार संघटनेच्या मागण्या मान्य करत उपोषणावर बसलेले सुनिल उपासे यांना ज्यूस पाजून उपोषण सोडवले.

नोंदणीकृत गवंडी बांधकाम कामगारांच्या परिवारासाठी विविध मदतीच्या योजना राज्य शासनाच्या अख्त्यारीत कामगार कल्याण मंडळाच्या निधीतून जिल्हा कामगार कार्यालया मार्फत राबविण्यात येतात परंतु कामगार कार्यालयात दलालांचा सुळसुळाट असल्याने खऱ्या कामगारांना योजनेचे लाभ न मिळता गैर कामगारांना योजनेचा लाभ कामगार कार्यालयात बसलेले नोंदणी अधिकारी सचिन अरबट व रिना पोराटे मिळवून देतात असा आरोप करत कामगारांना नाहक त्रास देणाऱ्या नोंदणी अधिकारी यांना निलंबित करण्यात यावे तसेच सरकारी कामगार कार्यालय येथे नियमित कामगार अधिकारी देण्यात यावा. नगरपरिषद मुख्य अधिकारी व ग्रामपंचायत ग्रामसेवक यांच्या सही निशी कामगारांची नोंदणी व नूतनीकरणाचे अर्ज विनाकारण नामंजूर केले असून ते मंजूर करून देण्यात यावे. कामगारांचे अनुदानाचे अर्ज जे विनाकारण नामंजूर केले ते मंजूर करून देण्यात यावे. कामगारांच्या ९० दिवस काम केलेल्या प्रमाण ग्रामपंचायत ग्रामसेवक व नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्या सही शिक्का असल्यास कुठल्याही अटी व शर्ती न लावता आपल्या कामगार कार्यालयातून नोंदणी व नूतनीकरणाचे अर्ज मंजूर करण्यात यावे.या मागणीसाठी जिल्ह्यातील विविध गवंडी बांधकाम कामगार संघटनानी यलगार पुकारून दि. २९ डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात उपोषणाला बसले होते. आरोपाचे गांभीर्य पाहता कामगार नोंदणी अधिकारी सचिन अरबट व रिना पोराटे यांनी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांच्या मध्यस्थीने उपोषणकर्त्यांच्या मागण्या मान्य करून उपोषण सोडवले. यावेळेस शिवसेनेचे लोकसभा संघटक रविकांत बालपांडे, लोकसभा सह संपर्क प्रमुख श्रीकांत मिरापूरकर,जिल्हा समन्वयक अनिल देवतारे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख दिलीप भुजाडे, उपजिल्हा प्रमुख मिलन गांधी,उप शहर प्रमुख धरम शेंडे, शिवसेनेचे कामगार नेते तसेच गवंडी बांधकाम मजदूर यूनियनचे अध्यक्ष प्रशांत रामटेके, जनवादी बांधकाम संघटनेचे अध्यक्ष महेश दुबे, कर्मवीर बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष नानाजी झिलपे, अशोका गवंडी बांधकाम संघटनेचे अध्यक्ष रमेश धोबे, संघर्ष बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष राहुल नगराळे, प्रफुल मुंदाने, दिनेश बांबल,नितेश भुजाडे,विशाल नगराळे, जानराव नागमोते, विजय डोमडे, विनोद तेलतुमडे, रमेश देवतळे, मिलिंद ब्राह्मणकर, राजू देऊळकर, जयश्री भीमके,संजय कुरील, ज्योती मून, ममता राऊत, संजय वाटकर सहित कामगार संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# वैष्णवीचे पदविका परिक्षेत नेत्रदिपक यश

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी,दि. ३०**



स्थानिक नगर परिषद गांधी विद्यालयाची विद्यार्थिनी वैष्णवी कैलास कुऱ्हाडे हिने संत गाडगे महाराज विद्यापीठ अमरावती येथून एम. एस.सी. कम्प्युटर सायन्सच्या परीक्षेत मेरिटमध्ये येत प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

वैष्णवीचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा येथे झाले असून त्यानंतरचे शिक्षण नगर परिषद माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय येथून झाले त्यानंतर तिने बीएससी शिवाजी सायन्स कॉलेज अमरावती येथून पूर्ण केले. तिने यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांना दिले तिच्या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य विश्वेश्वर पायले, विजय जवादे, विजय शेंडे, सचिन कांबळे ,दत्तात्रय खंदारे ,अमोल उगे , राजेश अहिव, बी. डी.चौकोने , सर्व,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी केले. शहरात तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# रेल्वे स्टेशनवर तात्काळ आरक्षण तिकीट मिळण्याची सोय उपलब्ध करा

**खासदार काळे यांचे विभागीय रेल्वे प्रबंधकांना निर्देश**

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. ३०**

नांदेड हा रेल्वे मार्ग कॉंग्रेस पक्षाचे सरकार असतांना मंजूर झाला होता व सध्या हा मार्ग कळंब – यवतमाळच्या दरम्यान पर्यंत पुर्ण झाला व उर्वरीत रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे. या मार्गावर वर्धा ते कळंबपर्यंत गाड्या धावतात. या मार्गावर देवळी स्थानकावर आरक्षण तिकीट काउंटर नाही.ही बाब जाणून घेत खासदार अमर काळे यांनी तात्काळ मध्य रेल्वे नागपूर हयांचेशी दुरध्वनीद्वारे संपर्क केला व देवळी येथे रेल्वे स्थानकावर आरक्षण तिकीट मिळण्याची सोय उपलब्ध करण्याबाबतचे पत्र त्यांनी रेल्वे प्रबंधकांना दिले आहे.

देवळी गावातील केवळ पोस्ट ऑफिसमध्ये रेल्वे आरक्षण सुविधा उपलब्ध होत्या. तथापि, गेल्या दोन महिन्यांपासून, पोस्ट ऑफिसमधील रेल्वे आरक्षण तिकीट सुविधा पोस्ट ऑफीसद्वारे बंद करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील रहिवाश्यांना आरक्षण तिकीट मिळविण्यात मोठ्या अडचणी येत आहेत. आरक्षण तिकिटांसाठी, रहिवाशांना वर्धा, नागपूर किंवा यवतमाळ येथे जावे लागते व हयात प्रवाश्यांचा बराच वेळ जातो. आरक्षण सुविधा उपलब्ध झाल्यास सर्व देवळी तालुकावासीयांची रेल्वे आरक्षण तिकीट काढण्याची सोय देवळी येथे होईल.



# मोफत आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**हिंगणघाट ,दि. ३०**

माँ जगदंबा शिक्षण संस्था व पंचशिल हनुमान मंदिर यांच्या अंतर्गत स्व. रामभाऊ रघाटाटे यांच्य आठव्या स्मृती प्रित्यर्थ मोफत आरोग्य तपासनी शिबीर पंचशील हनुमान मंदिर, दत्त मंदिर वार्ड येथे आयोजित करण्यात आले होते..

या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात बिपी मधुमेह .प.उ.मोफत नेत्ररोग निदान, शिबिरमध्ये एकुन २१६ रुग्नांची तपासनी झाली. शिबिरमध्ये नेवा हार्ट हॉस्पिटल नागपूर येथिल डॉ. चेतन ढोबळे (वैद्य) यांनी रुग्नाना हृदयरोग संदर्भात आरोग्यबाबात माहीती दिली. तसेच श्री नारायण डोळयांचा दवाखाना वर्धा येथिल डॉ. सोनल लोहिया यांनी डोळयांचे आजर व याची लक्षणे कशी असतात आणि नियमितपने काळजी कशी घ्यावी, याचे रुगणाना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन अभिजीत रघाटाटे यानी केले व आभार प्रदर्शन माजी नगरसेवक मनोज वारघणे यानी केले. शिबिराच्या यशस्वीतेकरिता कांचन ननंदकर, दुर्गा कामडी, दिपाली कामडी, प्रमिला कुंभारे, दिनकर घाटे , योगिता सहारे,राहुल रघाटाटे, रितेश बोभाटे यानी सहकार्य केले.

# मोटरसायकलच्या वादातून दोघांनी धारदार शस्त्राने पोटावर मारून केली मित्राची हत्या

**हिंगणघाट,दि. २८**

मोटरसायकलच्या वादातून दोघांनी धारदार शस्त्राने पोटावर मारून मित्राची हत्या केली.

तालुक्यातील आर्वी छोटी येथे राहणारा चंद्रगुप्त मोहपण कांबळे (वय ३८)या युवकाचा त्याचे दुचाकी चालविण्यावरून झालेल्या वादात आरोपी मित्र आदेश व भूषण यांनी धारदार शस्त्राने चंद्रगुप्त याच्या पोटात वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी चंद्रगुप्त याला कस्तुरबा गांधी रुग्णालय येथे उपचारासाठी नेले असता तेथे उपस्थित चिकित्सकांनी तपासणी करून मृत घोषित केले. ही घटना हिंगणघाट शहरात घडली.

# इनरव्हील क्लब आणि स्नेहदीप कॉन्व्हेंटने एकत्रित पणे साजरा केला नाताळ सण



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट,दि. ३०**

येथील इनर व्हील क्लब ऑफ यांच्या वतीने स्नेहदीप कॉन्व्हेंट येथे आनंददायी ख्रिसमस साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम उत्साह आणि सणासुदीच्या वातावरणाने भरलेला होता, ज्यामुळे विद्यार्थ्यांसाठी हा अनुभव अविस्मरणीय ठरला. विविध मनोरंजक उपक्रम जसे की प्रश्नमंजुषा, संवादात्मक प्रश्नोत्तर आणि वेगवेगळे खेळ आयोजित करण्यात आले. विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना मिठाई व चॉकलेट्स वाटप करून आनंद आणि आनंदोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व ख्रिसमस सणाचा आनंद लुटला, त्यामुळे हा उपक्रम मोठ्या यशस्वीपणे पार पडला. रिच टु इन्स्पायर श्रेणी अंतर्गत या कार्यक्रम अंतर्गत इनर व्हील अध्यक्षा कुमुद व्यास, प्रोजेक्ट डायरेक्टर ललिता बेले, डॉ. अपर्णा मुडे, डॉ. रेखा नानोटकर, अर्चना ऐटीवार, मोनाली मॅडमवार, अक्षता, स्नेहदीप कॉन्व्हेंटच्या प्राचार्या रुपाली सरोदे, शिक्षक गण ३०० मुलांनी हा सोहळा साजरा केला.

# सहकारी पतसंस्थेला विदर्भस्तरीय आदर्श पतसंस्था पुरस्कार प्रदान



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी ,दि. ३०**

भारत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्थेला विदर्भ क्रेडीट को-ऑपरेटिव फेडरेशन अमरावती द्वारे कर्मचारी पतसंस्था गटातुन सन २०२४-२०२५ करिता विदर्भस्तरीय आदर्श पतसंस्था पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्राप्त करणारी वर्धा जिल्ह्यातील एकमात्र पतसंस्था आहे.

अमरावती येथे आयोजित विदर्भस्तरीय पतसंस्थाच्या कार्यशाळा कार्यक्रमात संस्थेच्या वतीने पतसंस्थेचे उपाध्यक्ष डॉ. गणेश मोहोड ,मानद सचिव सचिन दिघडे, संचालक मोहन तायडे, विलास येडमे,व्यवस्थापक आशिष हिवसे व लेखापाल सुरज पवार यांनी सई डहाके,सुलभा खोडके या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला. पत संस्थेच्या सभासदांनी व कर्मचा-यांनी दिलेले सहकार्य व माजी संचालक मंडळांनी पतसंस्थेच्या प्रगती करता केलेल्या कार्यातून दुसऱ्यांदा संस्थेला विदर्भस्तरीय आदर्श पतसंस्था पुरस्कार पतसंस्थेला प्राप्त होऊ शकला व पतसंस्थेचे व सभासदाचे हीत जोपासून उत्तरोत्तर प्रगती करण्याचा प्रयत्न संचालक मंडळाद्वारे केला जाईल असा विश्वास कार्यरत पदाधिकारी व संचालकानी व्यक्त केला.पतसंस्थेला विदर्भस्तरीय आदर्श पतसंस्था पुरस्कार २०२४-२५ करिता प्राप्त झाल्याबद्दल संस्था सचिव अॅड. शोभा काळे, उपाध्यक्ष दिनेश देशमुख,प्रदिप काळे, संदीप काळे,पत संस्थेचे अध्यक्ष अभिजीत काळे , विजय पवार, माजी अध्यक्ष व सभासद सुनील इंगोले,डॉ.प्रा.अविनाश कदम, प्रा. अभय दर्भे, डॉ. प्रा.रवींद्र सोनटक्के तसेच सभासद व कर्मचा-यांनी कौतुक केले.

# तीन वर्षांपासून सिंचन विहिरीचे अनुदान प्रलंबित

**शेतकऱ्यांचा सात दिवसांचा अल्टिमेटम**
**कृषी पंपासाठी सोलर सक्ती नको - महावितरणचा वीजपुरवठा पर्याय द्यावा**
**राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस व शिवराया संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट,दि. ३०**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस व शिवराया संघटनेच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी वर्धा तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. मनरेगा अंतर्गत सिंचन विहिरीचे तीन वर्षांपासून प्रलंबित असलेले अनुदान तात्काळ देण्यात यावे, तसेच कृषी पंपासाठी सोलरची सक्ती रद्द करून महावितरणमार्फत वीजपुरवठा सुरू ठेवावा, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

तीन वर्षांपूर्वी शासनाने मनरेगा अंतर्गत मोठ्या प्रमाणात सिंचन विहिरींचे वाटप केले होते. त्यावेळी लवकरच अनुदान देण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आजतागायत अनुदान न मिळाल्याने अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.



विहिरीचे खोदकाम व बांधकाम करताना अनेकांनी खासगी फायनान्स किंवा व्याजाने पैसे घेतले असून, अनुदान रखडल्याने कर्जाचा बोजा वाढत चालला आहे. यावर्षी पावसाअभावी पीकपाणी कमी झाल्याने शेतकऱ्यांवर आणखी आर्थिक संकट ओढवले आहे.

दरम्यान, कृषी पंपासाठी सोलरची सक्ती करण्यात आली आहे. मात्र सोलर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती व्यवस्था जिल्ह्यात उपलब्ध नाही. दुरुस्तीचा खर्चही मोठा असून वादळ, पाऊस यामुळे सोलर पॅनलचे नुकसान होत आहे. याउलट अनेक शेतकऱ्यांनी महावितरणकडे वीजजोडणीसाठी डिमांड भरली होती; मात्र शासनाने जीएसटी कपात करून उर्वरित रक्कम डीडीद्वारे परत केली आहे. त्यामुळे सोलर सक्ती रद्द करून महावितरणमार्फत नियमित वीजपुरवठा सुरू ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

येत्या सात दिवसांत या मागण्यांवर तोडगा न निघाल्यास अर्धनग्न आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले, प्रदेश उपाध्यक्ष संदीप कीटे, माजी सरपंच गजानन नरड, शिवसेना नेते गोपाल मेघरे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष प्रणय कदम, कार्याध्यक्ष सचिन पारसडे, शिवराया संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नितीन सेलकर, विकास गोठे, रोशन नरड, मयूर डफ, वासुदेव कोडापे, उपसरपंच श्रीकांत मेंढे, गजानन चिंचोलकर, मयूर उगेमुगे, विलास अवचट, राहुल सुरकार, अशोक सेलकर, केशोर सेलकर, राजू अश्टणकर, प्रफुल गोठे, अजय नीमसडकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

### संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वच्छता अभियान

**हिंगणघाट :** वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त ६९ व्या यात्रा महोत्सवानिमित्त हिंगणघाट शहरातील पतंजली योग परिवारात द्वारे रविवार २८ डिसेंबर रोजी वणा नदीच्या तीरावर स्वच्छता अभियान राबविण्यात आली. दरवर्षीप्रमाणे नित्यनेमाने ते कोणतीही सूचना न देता स्वच्छता राबवत असते. आणि याला उत्स्फूर्त प्रतिसाद सुद्धा मिळते. कार्यकर्त्यांनी नदी परिसर श्रमदानाने एकदम स्वच्छ केले. कोणतेही गाजावाजा न करता या श्रमदानामध्ये शेकडो कार्यकर्त्यांनी भाग घेऊन परिसर स्वच्छ केला. स्वच्छतेच्या हा कार्यक्रम अविरत सुरू राहील अशी ग्वाही सहभागी कार्यकर्त्यांनी यावेळी दिली.

